अतिरिक्त महापालिका आयुक्त(ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा. क्र. अतिमआ(ज)/उआ(साप्र)/५०३९
दिनांक १६/१०/२०२०

**-:कार्यालयीन आदेश:-**

**विषय:-** पुणे महानगरपालिकेच्या कार्यालयांना सन २०२० मध्ये द्यावयाच्या अतिरिक्त स्थानिक सुट्टयांबाबत.

**संदर्भ :-** १. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालयाकडील कार्यालयीन परिपत्रक जा.क्र. अतिमआ(ज)/उआ(साप्र)/७८००, दि. १७/०१/२०२०
२. विभागीय आयुक्त कार्यालय, विधान भवन, पुणे विभाग (सामान्य प्रशासन विभाग) जा. क्र. साप्र/५/कावि/२८३/२०२०, दि. ०१/१०/२०२०

मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांचे मार्फत प्रतिवर्षी प्रमाणे जाहीर करण्यात आलेल्या अतिरिक्त तीन स्थानिक सुट्या पुणे महानगरपालिकेच्या सर्व कार्यालयांना संदर्भ क्र. १ चे कार्यालयीन परीपत्रकान्वये जाहीर करण्यात आलेल्या आहेत.

मा. विभागीय आयुक्त कार्यालय,पुणे विभाग यांनी संदर्भ क्र. २ चे आदेशान्वये राज्य शासकीय कार्यालयांसाठी पाच दिवसांचा आठवडा लागू करण्यात आला असल्याने दि. १७ ऑक्टोबर २०२० रोजीची जाहीर केलेली शासकीय सुट्टी शनिवार येत असल्याने ती रद्द करून त्याऐवजी दि. १३ नोव्हेंबर २०२० (धनत्रयोदशी) रोजीची स्थानिक सुट्टी जाहीर केलेली आहे.

त्यानुषंगाने दि. १७ ऑक्टोबर २०२० रोजीची जाहीर केलेली शासकीय सुट्टी शनिवार येत असल्याने, ती रद्द करून त्याऐवजी दि. १३ नोव्हेंबर २०२०(धनत्रयोदशी) रोजीची स्थानिक सुट्टी पुणे महानगरपालिकेच्या सर्व कार्यालयांना (अत्यावश्यक सेवा वगळून) या कार्यालयीन आदेशान्वये जाहीर करण्यात येत आहे.

Rubal 15/10

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत :-

मा. महापालिका आयुक्त
मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज/वि/इ)
पुणे महागनरपालिका

यांजकडेस माहितीसाठी . . .

सर्व. संबंधित खातेप्रमुख
सर्व उप आयुक्त परिमंडळ क्र. १ ते ५
सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त
पुणे महानगरपालिका

यांजकडेस माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.